छात्र प्रबोधन

सौर चैत्र, शके १९४३ । वर्ष २१ अंक ७।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष २९ अंक ९)
वार्षिक वर्गणी ₹ २००। मूल्य ₹ २०। पृष्ठे २८

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!

विविध प्रकल्पांच्या माध्यमातून विविध तंत्रज्ञानाच्या साहाय्याने
प्रत्येक मुलापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोचवण्यासाठी
ज्ञान प्रबोधिनी, पुणे संस्थेचे

शैक्षणिक साधन केंद्र

MOOL (Movement of Open Online Learning)

मुक्त शिक्षणाची चळवळ

मान्यवर सहयोगी संस्था

Ministry of Education
Government of India

ज्ञानसेवा तु साफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

TCS iON

eTechSchool

CSR

MAERSK

Prescient Technologies

SEAGATE

www.jpearc.org

दिक्षा

DIKSHA

- शिक्षण मंत्रालयाशी संलग्न
- अध्ययन–अध्यपनासाठी उत्तम शैक्षणिक साधने मिळवण्यासाठी राष्ट्रीय संगणकीय पटल
- दिक्षा ॲपसाठी १००० पेक्षा जास्त व्हिडिओ निर्मिती
- विज्ञान, गणित, भूगोल, संस्कृत याविषयांव्यतिरिक्त आता मराठी या विषयावरही काम सुरू
- कर्ण बधिर विद्यार्थ्यांच्यासाठी मराठी आणि विज्ञान विषयाची व्हिडिओ निर्मिती चालू

ज्ञानवाहिनी

- स्पर्धा परीक्षा, भाषा शिक्षण, करिअर मार्गदर्शन
- वेगवेगळ्या प्रदेशातील शालेय विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी मार्गदर्शन

YouTube

ERCJPP
17.5K subscribers

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

छात्र प्रबोधन

सौर चैत्र, शके १९४३। वर्ष २१ अंक ७

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४/ऑगस्ट १९९२
एकूणात ३४५ वा अंक, वर्ष २९ अंक ९)

प्रकाशन दिनांक – सौर ११ चैत्र, शके १९४३/१ एप्रिल २०२१

अंतरंग

४. संवाद – शिल्पा कुलकर्णी
५. कथा... **मित्रा अभिमान वाटतो तुझा...!*** – एकनाथ आव्हाड
८. कविता... **हर्षोल्हासाची गुढी** – मुबारक शेख
९. प्रासंगिक... **महात्मा फुले आणि स्त्री शिक्षण!*** – मृणालिनी कानिटकर-जोशी
१२. भाषेची गंमत... **उंटावरचा शहाणा...** – नेहा लिमये
१३. ललित... **शिवाराचा रखवालदार-शृंगी घुबड*** – किरण पुरंदरे
१७. व्यक्तिविकसन... **परीक्षेच्या काळातला आहार** – ऋतिका भावसार
१९. विज्ञान प्रयोग... **गोलीय गती आणि बल*** – प्रितेश लोले
२०. कविता... **वसंत कर्तृत्व...** – राजेंद्र अत्रे
२१. ललित... **वसंत सौंदर्यसडा!!*** – डॉ. कांचनगंगा गंधे
२४. कलाकृतिपर... **रद्दी कागदापासून कलाकृती*** – हेमा धोत्रे
२५. भाषेची गंमत... **'एप्रिल'ची जन्मकथा!** – डॉ. कांचनगंगा गंधे
मलपृष्ठाच्या आतील पदय...**सळसळणारे धवल तेज हे...*** – विनय हर्डीकर

याशिवाय : शब्दांची करामत!(१६), बालकुमार मासिकांमधील साहित्याची झलक* (१८), बुद्धिला खुराक (२३), स्वयंशोध चाचणी, प्रतिसादी वाचकवीर व्हा...(२६)

पानाखालील ओळी : काव्यपंक्ती - चैत्रमासाविषयी... **माहितीपर** - भारतातील भौगोलिक वैशिष्ट्ये

१०० कथा वाचा!
'कुमारकथा'
ॲप द्वारे

मुखपृष्ठाविषयी : धायटी (संस्कृत : धातकी) या झुडपावर फुलांमधला मधुरस पिण्यासाठी आलेला चश्मेवाला किंवा चाळिशीवाला हा पक्षी. हा फोटो काढताना लपण (Hide) वापरलं. चश्मेवाला हा पक्षी बागा, उद्यानं, पानझडीची जंगलं आणि काही प्रमाणात मनुष्यवस्तीच्या आसपास दिसतो. याला हिंदीत 'बनमेहेंदी' तर भंडारा व गोंदिया जिल्हयांमध्ये 'जिलबुली' असेही नाव आहे. **– किरण पुरंदरे**

अवश्य वाचा... पाहा... ऐका...

*** या लेखांना QR कोड दिले आहेत ते स्मार्टफोनवर स्कॅन करा.**
त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR code scanner मोफत डाऊनलोड करून घ्या.

इ-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

ज्ञान प्रबोधिनीच्या पुस्तकांच्याऑनलाइन खरेदीसाठी **jpprakashane.org** या संकेतस्थळाला भेट द्या!

संपादक, प्रकाशक, मुद्रक
महेन्द्र सेठिया

मानद संपादक : शैलजा देशमुख

संपादक मंडळ
वाच. कांचनगंगा गंधे
नीलिमा करमरकर, आश्लेषा महाजन

कार्यकारी संपादक
शिल्पा कुलकर्णी

साहाय्यक कार्यकारी संपादक
अनादि ढवळे

मुखपृष्ठ प्रकाशचित्र : किरण पुरंदरे
आतील चित्रे : राहुल देशपांडे, सायली कुलकर्णी, प्राची खांडेकर

संपर्क पत्ता
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७१७४/१७५
संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org

छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी
वार्षिक : ₹ २०० द्वैवार्षिक : ₹ ४००
त्रैवार्षिक : ₹ ५५० दशवार्षिक : ₹ १७००
इ-अंक वार्षिक वर्गणी : ₹ १००

या अंकाची किंमत : ₹ २०/–

घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ५० जादा
चेक/डी.डी. **'ज्ञान प्रबोधिनी'** अथवा **'Jnana Prabodhini'** याच नावाने काढावा.

NEFT साठी बँकेचे तपशील पुढीलप्रमाणे –
Account Name - Jnana Prabodhini
Bank Name - Bank Of India
Account No.- 051510110004917
Branch - Shanipar, Pune
IFSC Code - BKID0000515
ऑनलाइन वर्गणी भरल्यावर 'छात्र प्रबोधन'ला मेल करून त्याचे तपशील कळवा.

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे.
परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे!... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ!!

वार्षिक देणगीदार –
- श्री. प्रमोद चिंतामण पेठे, पुणे
- एक हितचिंतक, पुणे
- श्री. शशांक चांदोरकर, पुणे
- श्री. उदय परांजपे, पुणे

संवाद

प्रिय प्रबोधकांनो,

सौर फाल्गुनचा (मार्च महिन्याचा) 'स्वीकारशीलता' विषयाला वाहिलेला विशेषांक वाचून झाला का? विशेषांकाबाबतच्या तुमच्या प्रतिक्रिया आमच्यापर्यंत नक्की पोहोचवा!

पाहाता-पाहाता तुमचं शैक्षणिक वर्ष संपत आलं. इयत्ता दहावीची परीक्षा एप्रिल अखेर सुरू होईल तर काही ठिकाणी इयत्ता नववीपर्यंतच्या शाळा एप्रिल अखेरपर्यंत चालू राहतील. एरवी एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासूनच, परीक्षांच्या काळात तुम्हाला सुट्टीचे वेध लागतात; पण कोरोना महामारीमुळे गेले वर्षभर आपण सगळे अनिश्चितता आणि भीतीच्या छायेखाली वावरत आहोत. शाळेत न जाता, दूरस्थ राहून, *ऑनलाइन* पद्धतीने अभ्यास करण्याचा, वेगळ्या प्रकारचा अनुभव तुम्हाला यावर्षी मिळाला. त्यादृष्टीने तुमचं हे शैक्षणिक वर्ष अगदी आगळंवेगळं ठरलं. वर्गात एकत्र न बसता, आपापल्या घरी एकटं, दूरस्थ राहून शिकण्यासाठीची मानसिकता तयार होणं, तंत्रज्ञान अवगत करून घेणं, आकलन होण्यासाठी मन एकाग्र करण्याचा प्रयत्न करणं आणि 'ऑनलाइन शिकवलेलं समजलं की नाही,' हे स्वत: ताडून बघण्यासाठी वेगवेगळे प्रयोग करणं असे एक ना अनेक अनुभव या शैक्षणिक वर्षात तुम्ही घेतले.

खरंतर, वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव तुम्ही दररोज घेत असता. त्यातले काही अनुभव हे तुमच्या अगदी लक्षात राहतात, तर काही अनुभव तुम्ही अगदी वरवर घेतलेले असतात. चित्त एकाग्र करून, पूर्ण समरस होऊन, तनमन झोकून देऊन एखादी गोष्ट जेव्हा तुम्ही करता, तेव्हा ती करतानाचा अनुभव तुमच्या दीर्घकाळ स्मरणात राहतो. पाहा बरं जरा आठवून असे प्रसंग... एखादं वाद्य, संगीत, कला, नवीन भाषा शिकतानाचे तुमचे अनुभव असतील... किंवा पोहणं, सायकल शिकतानाची तुमची धडपड असेल... हे मनातल्या मनात नुसतं आठवलं तरी ते शिकतानाची सगळी प्रक्रिया झरकन नजरेसमोर तरळून जाते आणि तुमचं मन ताजतवानं होतं.

असे वेगवेगळे अनुभव घेण्याच्या संधी शालेय वेळापत्रकातून देखील तुम्हाला मिळतात. उदा. तुम्ही निसर्गरम्य ठिकाणी सहलीला जाता, कधी संस्था भेट देता, कधी मान्यवरांच्या सहवासात काही काळ राहता इ. असे अनुभव तुम्हाला तेव्हाच समृद्ध करतील, जेव्हा तुमची ज्ञानेंद्रिये, पंचेंद्रिये तुम्ही जागृत ठेवाल! म्हणजेच, निसर्गाचे भारंभार फोटो व *सेल्फी* काढण्यापूर्वी उघड्या डोळ्यांनी, खुल्या मनाने तिथला निसर्ग पाहाल, त्याचा आस्वाद घ्याल, भौगोलिक वैशिष्ट्य समजून घ्याल, तिथल्या स्थानिक लोकांशी बोलाल, त्यांची जीवनशैली, त्यांच्या अडचणी समजून घ्याल. त्याचप्रकारे संस्था करत असलेलं काम समजून घ्याल. संस्थेत काम करणाऱ्या व्यक्तींशी संवाद साधाल, तुम्ही त्या संस्थेमध्ये कशाप्रकारे मदतीचा खारीचा वाटा देऊ शकाल, यावर विचार कराल. मान्यवरांच्या बोलण्यामागचा दृष्टिकोन, कळकळ आणि त्यांच्या कामामागची प्रेरणा समजून घ्याल. मान्यवरांची स्वभाववैशिष्ट्ये जाणून घ्याल. नाहीतर तंत्रज्ञानावर स्वार होण्याच्या नादात जे काही मिळवाल, ते तुमच्या *मोबाइलमध्ये* साठत राहील. त्यामुळे *मोबाइलची मेमरी फुल* होईल आणि तुमच्या मनाची *मेमरी* मात्र रिकामी, कोरी राहील! तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर केव्हाही घातकच!

येत्या सुट्टीत तुमची आवड लक्षात घेऊन मोजकीच उन्हाळी शिबिरे करा. समरस होऊन त्यामध्ये सहभागी व्हा! त्यातून मिळालेले अनुभव पचवण्यासाठी वेळ घ्या, त्या अनुभवांचा उपयोग करून घ्या. शिबिरातल्या सहभागाच्या प्रशस्तिपत्रकांची नाही तर तुम्हाला समृद्ध करणाऱ्या अनुभवांची संख्या वाढवा! त्यासाठी मनाला उत्साहाची आणि चैतन्याची पालवी फुटू द्या. अशाप्रकारे वेगवेगळे अनुभव घेण्याच्या संधी मिळवून तुमच्या व्यक्तिमत्त्वाला प्रगल्भतेचे धुमारे फुटू द्या!

वैविध्यपूर्ण अनुभव घेण्यासाठी, परीक्षेतील सुयशासाठी तसेच गुढीपाडव्यापासून सुरू होणाऱ्या नूतन वर्षासाठी तुम्हाला अनेक शुभेच्छा!

तुमची,
शिल्पाताई

माहिती मिळवा : भौगोलिक वैशिष्ट्ये - व्हॅली ऑफ फ्लॉवर्स (उत्तराखंड-चमोली) - मनमोहक फुलांनी नटलेली दरी.

वार्षिक देणगीदार - • **श्री. अमित बागाईतकर, पुणे** • **श्री. संजय प्रधान, सातारा**
• **श्री. गिरीश पळसकर, बंगळुरु** - कै. शरद पळसकर स्मृतिप्रीत्यर्थ.

मित्रा, अभिमान वाटतो तुझा...!

कथा

– एकनाथ आव्हाड

आज ना मी जाम खूश, आहे. काय म्हणता, 'काय विशेष घडलंय?'

अहो, विशेषच आहे. काय झालं, काल नेहमीप्रमाणे मी शाळेत गेलो. वर्गात नेमका पहिला तास गणिताचा. गणिताचा तास म्हटलं की, माझ्या कपाळाला सतराशे साठ आठ्या!

गणिताचे चौधरी सर वर्गात शिरले. तसा मी एकदम सटपटलो. 'आज सरांना, काय कारण सांगावं बरं?' मी विचारात पडलो.

वर्गातला सोहम हा माझा खास मित्र. नेहमीच माझी बाजू घेणारा. तो अभ्यासात हुशार. तर मी खेळात तरबेज. अभ्यासातल्या माझ्या अडचणी सोडवण्यासाठी तो नेहमी तत्पर. गणित विषय माझा नावडता आहे, हे माहितीय त्याला! मला तो नेहमी म्हणतो... 'गणितं समजून-उमजून सोडवत जा, गणिताशी मैत्री कर. मग बघ, गणितही तुझा आवडता विषय होईल.' पण मी हे लक्षात घेईन तर शप्पथ!

चौधरी सरांनी गृहपाठाच्या वह्या मागितल्या तशी मुलं पटापट वह्या घेऊन सरांकडे गेली. मी मात्र जागेवरच उभा, ओशाळवाणा! सरांचं माझ्याकडे लक्ष जाताच ते मला म्हणाले, "काय रे माधव, आज गणिताचा अभ्यास केला नाहीस वाटतं?"

"आईला बरं नाही सर. घरातल्या कामातच काल माझा सारा दिवस गेला," मी एका दमात बोललो.

सर लगेच म्हणाले मला, "असू दे, असू दे. अभ्यास होईलच नंतर. आधी आईची काळजी घे! तिच्या तब्बेतीकडे लक्ष दे! बस खाली."

हे खरे नववर्ष आपले, हा खरा सण आपला । या उभारूया गुढ्या अन् गोड करूया पाडवा।।

वार्षिक देणगीदार – • श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे • श्री. आदित्य मोडक, डोंबिवली
• एक हितचिंतक, नाशिक – कै. केदारेश्वर आचवल स्मरणार्थ

मला वाटले, 'चला, आपण सुटलो. हायसं वाटलं मला. पण कसलं काय? सोहम जागचा उठला आणि तडक गेला ना सरांकडे. आणि पुढचं काही मला कळायच्या आत, तो सरांकडे माझी तक्रार करून मोकळा झाला. म्हणाला, ''माधव खोटं बोलतोय सर. तो माझा मित्र असला, तरी मी त्याचा खोटेपणा लपवून ठेवणार नाही. त्याच्या आईची तब्बेत ठणठणीत आहे. हवं तर आत्ता त्याच्या घरी फोन लावून विचारा. खरंखोटं लगेच उजेडात येईल. सर्व मुलं माधवला घाबरतात, म्हणून ते सर्व गप्प आहेत; पण मी खरंच बोलणार! सत्य नेहमीच सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ आणि सुंदर असतं. माधव माझा मित्र असला म्हणून काय झालं? सर, चूक ते चूकच.''

मी सोहमवर चडफडलो. मित्र म्हणवतो मला आणि माझीच सरांकडे कागाळी करतो. संताप-संताप झाला माझा. मनात आलं, नको हा मित्र! आणि नको त्याची मैत्री!!

चौधरी सरांनी मग मला जवळ बोलावलं. आणि विचारलं, ''खरंखरं सांग माधव. अभ्यास का केला नाहीस?''

मी धीर गोळा करून अडखळत म्हणालो, ''मी खोटं बोललो सर. मला गणितं लवकर सुटत नाहीत. त्यामुळे अभ्यासाचा कंटाळा येतो. मग तुम्ही ओरडाल म्हणून मी खोटं बोललो.''

मग कसलासा विचार करून सर वर्गाला म्हणाले, ''मुलांनो, आपल्या स्वतंत्र भारताचं ब्रीदवाक्य 'सत्यमेव जयते.' तुम्हाला माहीतच आहे... म्हणजे, सत्याचाच शेवटी विजय होतो. लक्षात ठेवा, खोटं बोलणारा माणूस खोटं बोलून स्वतःचाच विश्वासघात करत असतो. माणूस का खोटं बोलतो, माहीत आहे? खरं बोलण्याचं धाडस त्यांच्या अंगी नसतं म्हणून!

आज सोहमने माधवच्या रागाची पर्वा न करता खरं बोलण्याचं धाडस दाखवलं. मित्राची चूक पाठीशी न घालता त्याने ती सांगितली. मला कौतुक वाटतं त्याचं.''

सर मनःपूर्वक बोलत होते आणि वर्ग जीवाचा कान करून ऐकत होता. सोहमवरचा राग मात्र, माझ्या मनात अजूनही धगधगत होता. 'त्याच्या बरोबरची मैत्री तोडायची,' असं मी ठरवूनच टाकलं.

सर पुढे म्हणाले, ''मला गांधीजींच्या आयुष्यातील एक प्रसंग आठवतोय. गांधीजींच्या कार्याने भारावून जाऊन एक तरुण सेवाग्राम आश्रमात गांधीजींकडे आला.

गांधीजींना म्हणाला, ''मलाही तुमच्यासारखेच देशासाठी काहीतरी करायचं आहे. तुम्ही जे सांगाल, ते मी करेन. सांगा, मी आजपासून काय काम करू?''

गांधीजी त्या हौशी उत्साही तरुणाकडे पाहून म्हणाले, ''आजपासून खरं बोलत जा.''

तो तरुण संभ्रमात पडला. त्याला वाटलं, 'हे काही काम आहे का?' तो गांधीजींना म्हणाला, ''अहो पण, आपण पाहतो, आपल्या सभोवती आपल्याला कितीतरी लोक

माहिती मिळवा : भौगोलिक वैशिष्ट्ये - उमंगोट नदी (मेघालय-डॉमकी) नदीचे पाणी नितळ व पारदर्शक.

वार्षिक देणगीदार - • डॉ. प्रियव्रत देशपांडे, चेन्नई • श्री. चैतन्य वझे, डोंबिवली • सौ. गीतांजली जोशी, सिकंदराबाद

खोटं बोलताना दिसतात. मग एकटा मी खरं बोलून देशात एवढा काय फरक पडणार आहे?''

गांधीजी पटकन म्हणाले, ''तुम्ही खरं बोललात तर देशातील खोटं बोलणाऱ्यांची संख्या एकाने कमी होईल.'' त्या तरुणाला कळून चुकले की, कुठल्याही चांगल्या गोष्टींचा स्वीकार, त्याचा अंगिकार आपल्यापासून करावा. बदलाची सुरुवात आपल्यापासून करावी. 'जगा सांगे तत्वज्ञान आणि स्वतः कोरडे पाषाण,' असं वागून चालणार नाही.

सर म्हणाले, ''माधव तुझ्या खोटं बोलण्याची शिक्षा हीच आहे की, यापुढे तूही आयुष्यभर आणि खरंच बोललं पाहिजे.''

मी आपणहूनच सरांकडे गेलो. आणि भरल्या गळ्याने सरांना म्हणालो, ''मी वचन देतो सर. यापुढे मी कध्धीच खोटं बोलणार नाही.''

माझं डोकं थोडं शांत झाल्यावर माझ्या लक्षात आलं की, सोहमसुद्धा माझ्या भल्याचाच विचार करत होता. मी खरं बोलावं म्हणूनच तर त्यानं तोंड उघडलं. वेळीच माझी चूक माझ्या लक्षात आणून दिली. माणूस एक

खोटं लपवण्यासाठी मग शंभरदा खोटं बोलत असतो. सोहमबद्दलचा माझ्या मनातला रागही मग निवळला. त्याचं 'खरं बोलणं' हे मला जरी मगाशी त्रासदायक वाटलं, तरी ते माझ्याच फायद्याचं आहे; हे मला चांगलंच उमगलं. खरा मित्र तोच जो आपल्या मित्राला वाईटाकडून चांगल्याकडे नेतो... यापुढे मीही नेहमी सत्य बोलणार!

मी सोहमकडे गेलो. त्याचा हात हातात घेऊन म्हणालो, ''सोहम, मित्रा, मला अभिमान वाटतो तू माझा मित्र आहेस याचा!''

माझं बोलणं ऐकून सोहमनं मला मिठी मारली. का कुणास ठाऊक सर्व वर्गाने उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजवल्या. त्या टाळ्यांचा कडकडाट अजूनही माझ्या कानात घुमतो आहे.

– एकनाथ आव्हाड
भाग्यवान सह. गृहरचना, ए-२०२,
खारदेवनगर, एन. जी. आचार्य मार्ग,
चेंबूर, मुंबई 400071

ऐका
कथा – अनाथांची ट्रेन
लेखक – फारुख काझी

हर्षोल्हासाची गुढी

वारा सुगंधी आणतो चैत्रभुलीचा सांगावा
करी सृष्टीला प्रसन्न सौंदर्याचा शिडकावा।।ध्रु.।।
दारी कोकिळेची तान
आकाशी रागबहार
सोसवेना डहाळ्यांना
गच्च मोहराचा भार
धुंद लकेर छेडित मैनेला बोलवी रावा
वारा सुगंधी आणतो चैत्रभुलीचा सांगावा ।।१।।
नव्हाळीचे चैतन्य
शीगोशीग पानोपानी
देहडोही किरणांचे
प्रतिबिंब आरस्पानी
नव्या वर्षात, हर्षात अवघा ऋतू भिजावा
वारा सुगंधी आणतो चैत्रभुलीचा सांगावा ।।२।।
जागते चराचरात
चैत्राचे लावण्यभान
हर्षोल्हासाची गुढी
हरपते देहभान
तुझ्या दर्शनात हा जन्म असाच सरावा
करी सृष्टीला प्रसन्न सौंदर्याचा शिडकावा।।३।।

– **मुबारक शेख,** १६२/८ ब, रेल्वेलाईन, सोलापूर 413001

हास्य लहरी

* एकदा एक पोपट उडता उडता ट्रकला धडकतो आणि बेशुद्ध होतो. ट्रक ड्रायव्हर पोपटाला घरी आणून पाणी पाजतो आणि पिंजऱ्यात ठेवतो. दोन तासांनी पोपटाला शुद्ध येते आणि स्वत:ला पिंजऱ्यात पाहून पोपट म्हणतो...

अरेच्चा!! मी तुरुंगात? ट्रक ड्रायव्हर मेला की काय?

* गोविंदरावांनी आंधळ्याकडे पाहून त्याच्याकडे पैसे फेकले. पण ते त्याच्या वाटीत न पडता घरंगळत जाऊन पलीकडच्या नालीत पडले, तरीही त्या आंधळ्याने ते जाऊन उचलले.

''अरे, पण तू आंधळा असून तुला कसे सापडले ते नाणे?''

''बा रावसाहेब! मी काय नेहमीचा पक्का आंधळा नाही! तो आज शिनेमा पाहाया गेलाय म्हून तेवढ्यापुरता, आलोय आज! नव्हं का !''

माहिती मिळवा : भौगोलिक वैशिष्ट्ये - वाळूचे डोंगर (राजस्थान-जैसलमेर) सोनेरी वाळूच्या टेकड्या.

वार्षिक देणगीदार – • डॉ. नीरज रायते, पुणे • चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे • श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे

महात्मा जोतीबा फुले आणि स्त्री शिक्षण!

– मृणालिनी कानिटकर–जोशी

समाजातील चुकीच्या समजुती, अंधश्रद्धा, चालीरीती यांच्या उच्चाटनासाठी महात्मा फुले यांनी स्वत:चे अवघे जीवन वेचले. स्त्रियांच्या शिक्षणाविषयी त्यांना विशेष कळकळ होती. स्त्रीशिक्षणाचे महत्त्व त्यांनी ओळखले होते. समाजाचा कडवा विरोध पत्करून त्यांनी पुण्यात मुलींसाठी शाळा सुरू केली. त्यासाठी त्यांना अतोनात संघर्ष करावा लागला. दि. ११ एप्रिल रोजी महात्मा फुले यांची जयंती! तो दिवस राष्ट्रीय शिक्षण हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने त्यांच्या शिक्षणविषयक व एकूणच सामाजिक कार्याचा संक्षिप्त परिचय प्रस्तुत लेखात करून दिला आहे.

महात्मा जोतीबा फुले हे एक द्रष्टे समाजसुधारक होते. समाजातील अनेक कुप्रथांवर त्यांनी प्रहार केले. शोषित, वंचित घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी लढा दिला. आणि मुख्य म्हणजे सामाजिक उतरंडीच्या खाली दबलेल्या स्त्रियांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. महात्मा फुले यांचे हे सामाजिक आणि स्त्री शिक्षण विषयक कार्य समजून घ्यायचे असेल, तर त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करणे फार गरजेचे आहे.

११ एप्रिल १८२७ रोजी महात्मा फुले यांचा जन्म झाला. त्याआधी साधारणपणे ९ वर्षे म्हणजे १८१८ साली पेशवाई संपुष्टात येऊन महाराष्ट्रात आणि त्याबरोबरच संपूर्ण देशात इंग्रज राजवट प्रस्थापित होत होती. इंग्रजांनी भारतीयांना जरी गुलामगिरीत ठेवले असले तरी त्यांना त्यांच्या राज्य कारभाराच्या दृष्टीने व त्यांच्या इतर सोयी सुविधांच्या दृष्टीने भारतात काही सुधारणा आणणे आवश्यक होते. त्याप्रमाणे त्यांनी अंमलबजावणी करायला सुरुवात केली होती. सर्वांना शिक्षण घेण्याची सुविधा उपलब्ध होत होती. त्याचप्रमाणे इंग्रजांच्या चालीरीती, भारतीयांच्या तुलनेत पत्नी सोबत वागण्यात असणारा त्यांचा मोकळेपणा, विदेशातील साहित्य, साहित्यिकांचे विचार याचाही परिचय भारतातील शिकल्या सवरल्या युवकांना होत होता. यातून एक वैचारिक मंथन घडत होते. त्याकाळी संपूर्ण समाज अंधश्रद्धा, चुकीच्या समजुती, रूढीग्रस्तांच्या गर्तेत सापडला होता. आणि त्यातून पटकन बाहेर येण्याची, जुन्या रूढी परंपरांना छेद देण्याची सर्वसामान्यांची मानसिकता नव्हती. पण त्या काळातील अनेक विचारवंतांनी, समाजधुरीणांनी यासाठी अतोनात कष्ट घेतले. प्रसंगी स्वत:च्या कुटुंबाच्या सुखावर पाणी सोडले. ह्या समाजधुरीणांमधील एक महत्त्वाचे नाव म्हणजे 'महात्मा जोतीबा फुले'.

'विद्येविना मती गेली,
मतीविना नीती गेली,
नीतीविना गती गेली!
गतीविना वित्त गेले,
वित्ताविना शूद्र खचले,
इतके अनर्थ एका अविद्येने केले।।'

जोतीबांचे हे प्रसिद्ध वचन. शिक्षणावाचून

वार्षिक देणगीदार – • सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टेक्सास, अमेरिका
• डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, शेफिल्ड, यु.के. • डॉ. संजय गद्रे, धुळे



माणसाची विशेषतः समाजातील वंचित घटकांची काय दुरवस्था होते, याचे अचूक विश्लेषण यात जोतीबांनी केले आहे. त्या काळात अज्ञानामुळे व दारिद्र्यामुळे शेतकरी व कष्टकरी समाज अधिकाधिक परिस्थितीशरण, अंधश्रद्ध आणि कर्जबाजारी होत होता. त्यात स्त्रियांची अवस्था तर फारच करुणाजन्य होती. धर्माच्या नावाखाली स्त्रियांनी शिक्षण घेण्याला मनाई तर होतीच; पण घरात/शेतात अतोनात कष्ट करणाऱ्या स्त्रियांना अत्यंत कमीपणाची, अपमानास्पद वागणूक दिली जायची. विधवा स्त्रियांना तर रुढींच्या प्रभावामुळे अत्यंत कष्टाचे, मानहानीचे जीवन व्यतीत करावे लागत असे. ह्या 'दुरवस्थेतून साऱ्या समाजाला बाहेर काढायचे असेल, तर ह्या जुनाट रूढी परंपरांना छेद देणे गरजेचे आहे;' हे महात्मा फुले यांनी ओळखले होते. त्यामुळेच त्यांनी **सत्यशोधक समाजाची स्थापना केली.** यात सर्व समाजातील आधुनिक विचारांचा पुरस्कार करणारे लोक सामील होत गेले. मोठी चळवळ उभी राहू लागली. जातीभेद नष्ट करणे, धर्माचा पगडा असल्यामुळे निर्माण झालेल्या अनेक रूढी, परंपरांना छेद देणे, केशवपन प्रथेला विरोध करणे अशा अनेक क्रांतिकारक गोष्टी महात्मा फुले यांनी त्या काळात केल्या. आपल्या घरातील पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला केला.

जोतीबांच्या ह्या सामाजिक सुधारणेच्या महान कार्यामधील अत्यंत महत्त्वाचे आणि समाज सुधारणेच्या दृष्टीने क्रांतिकारक ठरलेले पाऊल म्हणजे 'स्त्री शिक्षणा'ची सुरुवात! घरची बाई शिकली तर संपूर्ण कुटुंब साक्षर होते, हे ओळखून जोतीबांनी आपल्या पत्नीला म्हणजेच सावित्रीबाईंना प्रथम शिक्षणाचे धडे दिले. त्यासाठी प्रसंगी घरच्यांचा विरोध आणि त्यांच्या क्रोधाचे धनी जोतिबा आणि सावित्रीबाईंना व्हावे लागले. १८४८ साली त्यांनी पुण्यात भिडे वाड्यात मुलींसाठी शाळा सुरू केली. यांच्या ह्या कार्याला समाजातून प्रचंड विरोध झाला. दोघांच्याही अंगावर शेणगोळे फेकण्यासारखे अत्यंत निंदनीय प्रकारही घडले. पण न घाबरता, न डगमगता त्यांनी आपले शिक्षणाचे कार्य चालूच ठेवले. त्या शाळेत सावित्रीबाईंनी स्त्रियांना शिक्षण द्यायला सुरुवात केली. पहिल्या स्त्री शिक्षिका म्हणून सावित्रीबाईंचे नाव आदराने घेतले जातेच; पण समस्त स्त्री वर्गाला बोट धरून अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या वाटेवर नेणारी सावित्रीमाय केवळ स्त्रियांच्याच नव्हे तर संपूर्ण समाजाच्या दृष्टीने नवक्रांती घडवणारी तेजशलाका ठरली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई यांना समाजातून जसा विरोध होत होता, तसा त्यांना थोडा सकारात्मक प्रतिसादही मिळत होता. मुलींसाठी शाळा सुरू करायला अनेक लोक जागा उपलब्ध करून देत होते. त्यामुळे जोतीबांनी पुण्यात विविध ठिकाणी मुलींसाठी अनेक शाळा सुरू केल्या. नंतरच्या काळात अनेक समाजसुधारक पुढे आले.त्यांनी देखील स्त्री शिक्षणाचं महत्त्व ओळखून स्त्रियांसाठी

माहिती मिळवा: भौगोलिक वैशिष्ट्ये - दृष्यादृष्य समुद्रकिनारा (ओडिसा-चंडीपूर) ओहोटीच्या वेळी समुद्र दिसेनासा होतो.

वार्षिक देणगीदार – • श्री. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे • श्री. सागर सुराणा, पुणे • सौ. वृषाली दिलीप अदवंत, पुणे

शाळा सुरू केल्या. महर्षी धोंडो केशव कर्वे, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, रमाबाई रानडे यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केल्या. आजही ह्या शाळा स्त्री शिक्षणासाठी मोलाचे कार्य करत आहेत; पण ह्या सर्व ज्ञानमंदिरांचा पाया महात्मा फुले यांनी रचला आणि सावित्रीबाईंनी त्याला अतिशय मोलाची साथ दिली! महात्मा फुले यांनी हे जे सर्व कार्य केले त्यात त्यांना जशी सुधारणावादी लोकांची साथ मिळाली तसाच रुढीग्रस्त आणि अज्ञानी अशा समाज घटकांकडून अतोनात त्रासही झाला. प्रसंगी आप्त स्वकीयांचा रोषही पत्करावा लागला; पण जोतीबा आणि सावित्रीबाई आपल्या ध्येयापासून तसूभरही ढळले नाही.

स्त्री शिक्षणाच्या ह्या संपूर्ण वाटचालीचा संघर्षमय; पण तरीही अभिमानास्पद अशा इतिहासाचे अवलोकन करताना आज आपल्याकडे स्त्री शिक्षणाची काय परिस्थिती आहे, याचा विचार करणे देखील अगत्याचे आहे. आज स्त्री नुसतीच साक्षर झाली, शिकली असं नाही, तर ती सर्वच क्षेत्रात आपल्या ज्ञानाचा अतिशय चांगला उपयोग करते आहे, देशाच्या विकासात आपले बहुमूल्य योगदान देते आहे.

पण त्याच बरोबर अतिशय खेदाने असे म्हणावे लागते की, आज अजूनही अनेक कुटुंबांमध्ये स्त्रीच्या शिक्षणाला तितकंसं महत्त्व दिलं जात नाही. आजही पैशांअभावी किंवा स्त्रीच्या शिक्षणाचं, तिच्या स्वातंत्र्याचे महत्त्व न पटल्यामुळे अनेक मुली शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकल्या जात आहेत. किंवा औपचारिकरित्या जरी त्या शिकल्या, तरी त्यांच्या कर्तृत्वाला विशेष वाव, महत्त्व दिले जात नाही. आजही अनेक स्त्रियांना केवळ घर-संसारातच जखडून ठेवले जाते. आजच्या काळाचा विचार करता कदाचित हे विधान हास्यास्पद किंवा

अतिशयोक्तीपूर्ण वाटू शकेल; पण हे सत्य आहे. म्हणूनच आजही आपल्याला स्त्री शिक्षणाकडे अधिक जागरूकपणे आणि गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. जेव्हा भारतामधील प्रत्येक मुलगी, प्रत्येक स्त्री स्वत:च्या मनाप्रमाणे शिक्षण घेऊ शकेल, स्वत:च्या आयुष्याबद्दलचे निर्णय स्वत: घेण्याचे स्वातंत्र्य मिळवेल, तो दिवस खऱ्या अर्थाने महात्मा फुले आणि सावित्रीबाई यांच्या स्त्री शिक्षणाच्या महत्त्वपूर्ण कार्याला न्याय देणारा ठरेल! जोतीबा व सावित्रीबाई यांच्या मार्गावरून जाणाऱ्या अनेक समाजसुधारकांच्या प्रयत्नांना यश देणारा ठरेल!!

ह्यासाठी आता प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. चला, आपापल्या पातळीवर आपण सारेच जण प्रयत्न करू या. स्त्री शिक्षणाची आणि तिच्या स्वातंत्र्याची पताका फडकावत ठेवू या. हीच खरी जोतिबा आणि सावित्रीबाईंना आदरांजली ठरेल...

मृणालिनी कानिटकर-जोशी
फ्लॅट नं. एफ-३४, वृंदावन पार्क अपार्टमेंटस,
महात्मा सोसायटीजवळ, कोथरूड, पुणे - ३८

ऐका
महात्मा फुले यांच्यावर
रचलेला पोवाडा

उंटावरचा शहाणा किंवा उंटावरून शेळ्या हाकणे...

'मूर्खासारखा सल्ला किंवा उपदेश' देणाऱ्या माणसाला उंटावरचा शहाणा असं म्हणतात. या म्हणीमागे एक गंमतशीर गोष्ट आहे.

एका माणसाच्या घराच्या अंगणात पाण्याने भरलेला एक रांजण होता. एके दिवशी म्हशीने पाणी पिण्यासाठी त्यात तोंड घातलं. तिचं तोंड कसंबसं आत गेलं खरं; पण तिची शिंगे आत अडकल्यामुळे ती बाहेर काही निघेनात. 'तिचं तोंड बाहेर काढायचं कसं,' हा मोठा प्रश्न येऊन पडला.

तितक्यात, दारावरून उंटावर बसून एक माणूस चालला होता. तो म्हणाला की, ''मला खाली उतरवायला न लावता माझ्या उंटासकट मला आत घ्याल तर मी उपाय सांगेन.'' त्या माणसाला आत घेण्यासाठी साहजिकच दरवाज्याची भिंत पाडावी लागली. तो माणूस आत गेल्यानंतर म्हणाला, ''म्हशीची मान कापण्याखेरीज दुसरा उपाय नाही.''

रांजणातून म्हशीचं तोंड तर बाहेर निघालं पाहिजे, म्हणून म्हशीचा मालक त्याही गोष्टीला कबूल झाला. म्हशीची मान कापली; पण तिची मुंडी रांजणात तशीच अडकलेली राहिली. तेव्हा उंटावरचा शहाणा म्हणाला, ''आता रांजण फोडला की झालं.''

त्याप्रमाणे केले तेव्हा ते तोंड बाहेर निघाले; पण त्या शहाण्या माणसाच्या चुकीच्या उपदेशामुळे भिंत पडली, म्हैस मेली आणि रांजणही फुटला. हाच रांजण अगोदर फोडला असता तर...! तेव्हापासून निरुपयोगी, नुकसानकारक किंवा निरर्थक सल्ला देणाऱ्या माणसाला 'उंटावरचा शहाणा' म्हटलं जातं.

असाच आणखी एक वाक्प्रचार म्हणजे 'उंटावरून शेळ्या हाकणे.' एकाला शेळ्यांना चारण्यासाठी घेऊन जायला सांगितलं, तर त्यांच्या मागोमाग पायी न जाता तो उंटावर बसूनच शेळयांना हाकू लागला. यावरून कामात अतिशय आळशीपणा करणं किंवा बेजबाबदारपणे कामं करणं याला 'उंटावरून शेळ्या हाकणे' असं म्हणू लागले.

या दोन्हींमध्ये बिचाऱ्या उंटाची काही चूक नाही; पण लोककथांद्वारा म्हणी-वाक्प्रचारात उंटाला स्थान मिळाले, हे मात्र खरं!

– **नेहा लिमये**, nehaalimaye@gmail.com

छात्र प्रबोधन मासिकाचे आजच सभासद व्हा!

वार्षिक वर्गणी : ₹ २००
इ-अंक वार्षिक वर्गणी : ₹ १००

ऑनलाइन वर्गणी भरण्यासाठी jpprakashane.org या संकेस्थळाला भेट द्या!!
subscription / सभासदत्व येथे क्लिक करा!

माहिती मिळवा : भौगोलिक वैशिष्ट्ये - कासचे पठार - (महाराष्ट्र -सातारा) ऑर्किड व कीटकभक्षी फुलांनी बहरलेले पठार.

वार्षिक देणगीदार – • डॉ. कृष्णकांत मानकर, मोशी, पुणे • एक हितचिंतक, पुणे • डॉ. अमित हरताळकर, चोपडा, जि. जळगाव

शिवाराचा रखवालदार शृंगी घुबड!

ललित

– किरण पुरंदरे

पिटेझरी या गावापासून सुमारे ६ किलोमीटर अंतरावर वलमाझरी नावाचं एक गाव आहे. वलमाझरी येथील ग्रामपंचायतीच्या कार्यालयात काम करणारे श्री. गणेश चंदू कंगाले हे माझे मित्र आहेत. त्यांना माझं पक्ष्यांचं वेड माहीत होतं. एका कामानिमित्त ते पिटेझरी गावात आलेले असताना त्यांनी मला एक फोटो दाखवला. त्या फोटोमध्ये जणू काही कापसाच्या गोळ्यांना काळ्या चोची लावल्यासारखी, खूप गोंडस दिसणारी ४ पिल्लं होती. ही शृंगी घुबडाची (Indian Eagle Owl Bubo bengalensis Franklin, 1831) पिल्लं होती. तो फोटो पाहून मला मनातल्या मनात आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. मी त्या पिल्लांचे आणि त्यांच्या पालकांचे उत्तम फोटो कसे काढता येतील, त्यांचं निरीक्षण कसं करता येईल याबाबत नियोजन करू लागलो.

शृंगी घुबडाच्या पिल्लाचा जवळून घेतलेला फोटो

अखेर एक दिवस आम्ही वलमाझरी गावात पोहोचलो. ज्या पाण्याच्या टाकीवर शृंगी घुबडाने घरटं केलं होतं, ती पाण्याची टाकी शोधून काढली. टाकीच्या एका बाजूला उभं राहून काही दिसतंय का ते पाहिलं. जागा बदलून एका घराच्या परसात उभे राहिलो. तेवढ्यात पाण्याच्या टाकीच्या शेजारी असलेल्या वडाच्या झाडावरून एक मोठं घुबड उडालं आणि पंखाची लयबद्ध उघडझाप करत दोन-तीन घरांवरून एका आंब्याच्या झाडात जाऊन बसलं. हे झाड एका शेताच्या बांधावर उभं होतं. मी एकूण अंदाज घेतला आणि गावकऱ्यांशी चर्चाही केली. घुबडाची पिल्लं लहान असल्यामुळे त्यांचं निरीक्षण करणं आणि अभ्यास करणं यासाठी बरीच तयारी करावी लागणार होती. जर टाकीवर चढलो तर घुबडाची पिल्लं घाबरून उड्या मारतील आणि स्थानभ्रष्ट (displace) होतील, अशी मला भीती वाटत होती. घुबडाचं एकही पिल्लू खाली जमिनीवर उभं राहून दिसत नव्हतं. अशा प्रकारे दोन-तीन वेळा घुबडांसाठी गावात आल्यानंतर एक दिवस मी आणि माझा मित्र रूपचंद भलावी *कॅमेरा*, दुर्बीण, *स्पॉटिंग स्कोप* आणि *ट्रायपॉड* असं सगळं साहित्य घेऊन वलमाझरी गावात पोहोचलो. टाकीच्या जवळ असलेल्या एका इमारतीला लागून धान्याच्या पोत्यांनी भरलेली *ट्रॅक्टर-ट्रॉली* उभी होती. मी या *ट्रॉलीवरून* वडाच्या झाडाला खेटून असलेल्या इमारतीवर चढलो. इथून मला बऱ्यापैकी उंची मिळत असल्यामुळे टाकीच्या एका खांबाच्या मागे बसलेली दोन पिल्लं दिसत होती. मी त्यांचे काही फोटो काढले. ही पिल्लं ऊन शेकत बसली होती.

***

गावातील लोकांचा विश्वास संपादन करावा म्हणून या घुबडांच्या बाबतीत जरा दमानं घ्यायचं असं मी ठरवलं. यानंतरचे जवळजवळ दोन तास

स्पॉटिंग स्कोपमधून घुबड बघताना गावकरी

आम्ही गावातल्या लोकांशी संवाद साधण्यात आणि लहान मुलांना *स्पॉटिंग स्कोपमधून* घुबड आणि गावात दिसणारे इतर पक्षी दाखवण्यात व्यतीत केले. गावातली मुलं *स्पॉटिंग स्कोपमधून* पक्षी बघून एकदम खूष झाली. गावातल्या कोणत्याही लहान मुलानं किंवा माणसानं आयुष्यात कधीही *स्पॉटिंग स्कोपला* कधी डोळा लावला नव्हता. प्रत्येकाला *स्पॉटिंग स्कोपमधून* पक्षी बघताना होणारा आनंद त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता. आज या गावात पक्ष्यांविषयी प्रेम आणि उत्सुकता निर्माण होण्यासाठी एक छान वातावरण तयार झालं होतं. या वातावरणाचं मुख्य आकर्षण होतं ते म्हणजे *स्पॉटिंग स्कोप.*

***

सुमारे तीन ते चार वेळा वलमाझरी गावाला भेट देऊनसुद्धा मी मनावर भरपूर ताबा ठेवला. मला टाकीवर चढून घुबडांची पिल्लं बघायची आहेत, त्यांचे *फोटो* काढायचे आहेत, असं कधीही मी श्री. कंगाले यांना सांगितलं नाही. शेवटी श्री. कंगाले यांनी आपणहूनच 'चला, पुरंदरेसाहेब, आता आपण टाकीवर चढू या,' असं सांगितलं. आम्ही एका लोखंडी शिडीवरून जमिनीपासून सुमारे २४ फूट उंच असलेल्या टाकीच्या पहिल्या टप्प्यावर पोहोचलो. या टाकीवर चढण्यासाठी एक सोय म्हणून लावलेल्या लोखंडी शिडीला दोन्ही बाजूंना कोणताही आधार नव्हता. त्यामुळे शिडीवरून चढताना खाली बघितलं तर डोळे गरगरत होते.

टाकीवर असलेल्या टिचभर जागेत शृंगी घुबडानं आपला संसार मांडला होता. त्याच्या चार पिल्लांपैकी दोन पिल्लं उडून गेली होती. उरलेली दोन पिल्लं टाकीच्या भिंतीला चिकटून निपचीत पडून राहिली होती. आम्हाला पाहताच, ती 'छछऽऽ ससससऽ' असा आवाज काढायला लागली. माझा अंदाज चुकीचा ठरला. दोन्ही पिल्लांनी आपली

माहिती मिळवा : भौगोलिक वैशिष्ट्ये - बेलम लेणी (आंध्रप्रदेश-कुर्नूल) जमीनीखाली तांबड्या खडकांच्या रचना.

वार्षिक देणगीदार - • डॉ. कीर्ती आपटे, पुणे • श्री. नागेश साने, पुणे • श्रीमती लीला आचवल, नाशिक

जागा अजिबात सोडली नाही. वीज चमकावी असा एक विचार माझ्या मनात येऊन गेला. तो म्हणजे, ही पिल्लं पकडायची आणि त्यांच्या पायांमध्ये खुणेचे वाळे (rings) अडकवायचे आणि त्यांना सोडून द्यायचं. या प्रयोगामुळे घुबडांची पिल्लं आपल्या जन्माचं क्षेत्र सोडून किती दूरवर जातात यावर प्रकाश पडू शकेल. टाकीच्या या टप्प्यावर बारीक बारीक हाडं आणि वांतीगोळ्या (pellets) पडलेल्या दिसल्या. घुबडाची पिल्लं घाबरू नयेत म्हणून पटकन् त्यांचे फोटो काढून आम्ही खाली उतरलो.

संध्याकाळ होता होता गाव सोडलं, तेव्हा दूर एका आंब्याच्या झाडावर पूर्ण वाढलेल्या, जोडीतल्या एका घुबडाची तिमिराकृती (silhouette) दिसली. ते दृश्य अक्षरशः मनावर गोंदलं गेलं. अस्ताला जाणाऱ्या सूर्याच्या लालसर प्रकाशाच्या पडद्यावर उठून दिसणाऱ्या आम्रवृक्षाच्या शेंड्यावर शेता-शिवारांचा रखवालदार बसला होता.

***

आंब्याची काही जुनी झाडं तोडल्यामुळे घुबडाच्या जोडीनं टाकीवरची जागा पकडली, असं कैलास कापगते या तरूणानं सांगितलं. कैलास म्हणाला, ''भाताच्या शेतावर सावली पडते आणि लोंब नीट धरत नाही; म्हणून लोकांनी जुने आम्रवृक्ष तोडून टाकले. वानरंही खूप त्रास देतात. त्यामुळे घुबडांचा आसरा गेला.'' घुबडाची ही जोडी गेली ४ वर्षं पाण्याच्या टाकीवरच्या अरुंद जागेत घरटं करत आहे, असं गावातल्या लोकांनी सांगितलं. ''पूर्वी लोक घुबडं पकडून त्यांचा उपयोग करणी, भानामती आणि मंत्रतंत्र विद्येसाठी करत असत. आता मात्र लोकांची धारणा बदलली आहे,'' असं कैलास म्हणाला. त्याच दिवशी कैलास आम्हाला त्याच्या घरी घेऊन गेला. त्याच्या घराच्या परसात

पाण्याच्या टाकीच्या भिंतीला
चिकटून बसलेली शृंगी घुबडाची पिल्लं

त्यानं आम्हाला उभं केलं आणि उतरत्या कौलारू छपरावर एका कोपऱ्यात बसलेलं घुबड दाखवलं. ते शृंगी घुबडाचं घरटं सोडून गेलेलं एक पिल्लू होतं. कैलासला घुबडाबद्दल माहिती होती, हे बघून मला खूप बरं वाटलं. त्यानं अभिमानानं सांगितलं की, आमच्या गावात कुणीही घुबडांना त्रास देत नाही. कुणीही त्यांच्या वाटेला जात नाही. कैलास, गणेश आणि वलमाझरी गावातले शेकडो लोक घुबडांबद्दल सहानुभूती बाळगून होते, याचा मला खूप आनंद झाला.

शृंगी घुबडाची कृषिपरिसंस्थेतील भूमिका उंदीरनाशक अशी आहे. पूर्ण वाढलेलं गव्हाणी घुबड (Barn Owl) एका वर्षात सुमारे ३ लाख उंदरांचा फन्ना उडवतं असा एक अभ्यास आहे. घुबडाला लक्ष्मीचं वाहन मानलं जातं; कारण उंदरांच्या संख्येवर नियंत्रण राहिलं तर धान्याचं उत्पादन वाढतं आणि 'लक्ष्मी' घरात येते.

शृंगी घुबड सुमारे ४८.५ सेंटीमीटर लांब असतं. या घुबडाची नोंद हिमालयाच्या पायटेकड्यांपासून (foothills) भारतीय द्वीपकल्पापर्यंत सर्वत्र झाली आहे. नागझिऱ्याच्या परिसरातील गायखुरीच्या

वार्षिक देणगीदार – • श्री. रवींद्र पालेकर, पुणे • श्री. राहुल भिडे, पुणे
• सौ. सुमेधा अरूण केळकर, पुणे

आंब्याच्या झाडावर बसलेलं, पूर्ण वाढलेलं शृंगी घुबड

डोंगरांमध्ये आणि पानगळी अरण्यात हे घुबड दिसतं. ते मनुष्यवस्तीच्या आसपासदेखील येतं. हा पक्षी दिनथारा (day roost) म्हणून 'झाल' निवडतो, असं माझं निरीक्षण आहे. 'झाल' म्हणजे मोहाचा मोठा वृक्ष.

घुबडाबद्दलच्या चर्चेच्या प्रांतात समस्त वलमाझरीकर सामील झाले होते, यावरूनच शृंगी घुबडाचं या परिसरातलं भवितव्य उज्ज्वल आहे, हे माझ्या लक्षात आलं.

या घुबडाच्या जोडीनं मानवी वस्तीशी जुळवून घेतलं आहे. ही जोडी मानवनिर्मित इमारतींचा वापर घरट्यासाठी करू लागली आहे. त्यादृष्टीनं घुबडात एक प्रकारचं अनुकूलन (adaptation) होत आहे. घरट्याच्या आजूबाजूला शांतता असेल, माणूस-काणूस नसेल तर घुबड वडाच्या उंच, आडव्या पसरलेल्या फांदीवर बैठक जमवत होतं. जिथे तिथे कडमडणाऱ्या कावळ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी जोडीतला एक पक्षी वडाच्या झाडाचा उपयोग मनोऱ्यासारखा करत होता. एक दिवस कैलासनं स्वतः प्रयत्न करून काढलेला घुबडाचा एक फोटो मला पाठवला. मावळत्या उन्हात कौलारू छपराच्या कण्यावर बसलेलं शृंगी घुबड!

यथावकाश घरट्यातली उरलेली दोन्ही पिल्लं मोठी झाली आणि घरट्याची जागा सोडून उडून गेली. परंतु संध्याकाळ झाली की, घुबडाची जोडी आणि त्यांची पिल्लं अधूनमधून गावशिवारात दिसतात आणि शेत-शिवारांची जणू रखवाली करतात!

❀❀

– किरण पुरंदरे
pakshiweda@yahoo.co.in

पाहा
घुबडांची वैशिष्ट्ये दाखवणारी
चित्रफीत.

अक्षरांची करामत

खाली काही शब्द दिले आहेत, त्या शब्दासमोर त्याचाच समानार्थी शब्द लिहायचा आहे.

हा समानार्थी शब्द 'अं' किंवा 'भू' या अक्षराने सुरू होतो.

१. काजळ	=	अं - -
२. घरासमोरील मोकळी जागा	=	अं - -
३. हत्तीच्या पाठीवरील हौदा	=	अं - -
४. आकाश	=	अं - -
५. तफावत	=	अं - -
६. धरणीकंप	=	भू - -
७. जमीनदान	=	भू - -
८. जमिनीवर फिरणारे	=	भू - -
९. राजा	=	भू - -
१०. जमिनीखालील पाणी	=	भू - -

माहिती मिळवा : भौगोलिक वैशिष्ट्ये - चीर बत्ती (गुजरात-कच्छ) गूढ रहस्यमय नाचणारे दिव्यांचे झोत.

वार्षिक देणगीदार - • श्री. विनोद कुलकर्णी, पुणे • श्री. निखिल आपटे, पुणे • डॉ. विकास हरताळकर, चोपडा, जि. जळगाव

परीक्षेच्या काळातला आहार!

– ऋतिका भावसार

मित्रमैत्रिणींनो, या शैक्षणिक वर्षात शाळेत न जाता 'परीक्षा' द्यावी लागणार! आत्तापर्यंत बराचसा काळ घरीच बसून *'ऑनलाइन'* अभ्यास, मित्रांबरोबर फोनवर गप्पा, *व्हिडिओ कॉल*, *गेम्स* आणि बरोबरीला सतत काहीतरी विशेषत: 'चमचमीत' खाणं असंच चालू होत नां? आता मात्र परीक्षा जवळ आलीय... तुम्हाला आता शारीरिक उत्साह, ताकद वाढवण्याबरोबर एकाग्रतेने अभ्यास करण्याची आणि तो लक्षात ठेवण्याची क्षमताही वाढवायला पाहिजे. त्यासाठी 'योग्य आहार' घेतला पाहिजे, तो आहार कसा असावा हे आपण समजून घेऊ या.

अभ्यासाला बसण्याअगोदर एकाग्रता वाढवण्यासाठी प्रथम देवाला मनापासून नमस्कार करा. पाच सूर्यनमस्कार घाला. नंतर सकाळची न्याहरी करा. त्यात हलके पदार्थ खा. दूध, पराठा, थालिपीठ, पौष्टिक लाडू यांपैकी काहीही खा. त्याबरोबर एखादं फळं किंवा सुकामेवा खाऊ शकता. शरीरात पाण्याचं प्रमाण योग्य राखणं गरजेचं असतं! त्यासाठी दर अर्ध्या तासानं पाव भांडं तरी पाणी प्या, म्हणजे थकवा येणार नाही. आणि उन्हाने ग्लानीपण येणार नाही. दुपारच्या वेळेस पाण्याऐवजी लिंबू, कोकम किंवा गुलाब सरबत प्या. शक्यतो घरी केलेली सरबतं प्या. बाहेरच्या सरबतात *'प्रिझरव्हेटीव्हज'* असतात. नारळपाणी, लस्सी, किंवा ताक पिणंही चांगलं.

सकाळच्या न्याहरीची आणि दोन्ही वेळच्या जेवणाची वेळ नक्की करून घ्या. वेळेत फारसा बदल करू नका. जेवताना हलका आहार घ्या. परीक्षेच्या काळात शक्यतो गोड पदार्थ खाण्याचं टाळा; कारण त्याने तुमचे पोट जड होईल आणि तुम्हाला सुस्ती येईल. सकाळच्या जेवणात थोडा भात, पोळी, भाजी, कोशिंबीर यांचा समावेश करा. त्यातही रोज वेगवेगळ्या भाज्या आणि कोशिंबीरीसाठी टोमॅटो, गाजर, बीट किंवा भोपळ्याचं रायतं यांचा उपयोग करा. वरण-भात, पोळी यावर साजूक तूप घालून जरूर खा. तुपामुळे चयापचयाची क्रिया सुरळीत होते. संध्याकाळी सफरचंद, केळं, संत्र, चिक्कू अशी फळं खा. तेलकट पदार्थ खाण्याचे टाळा. रात्रीच्या जेवणात भाताऐवजी एखादी पोळी वाढवा. भरपूर सूपही प्या. सफरचंद, केळं पौष्टिक असतात. संत्र्यामध्ये 'सी' *व्हिटॅमिन* असतं.

या काळात तुम्हाला तुमची प्रतिकारशक्तीही वाढवणं गरजेचं आहे. प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी दूध, दुधाचे पदार्थ (पनीर, दही, योगर्ट वगैरे)

पालेभाज्या, डाळी, मोड आलेली कडधान्ये (कच्ची किंवा शिजवलेली) त्यावर लिंबू पिळून खावी. ब्रोकोली, टोमॅटो सूप, संत्री, मोसंबी, जवस आणि कढीपत्ता चटणी यांचा समावेश वेगवेगळ्या दिवशी आहारात करा.

याशिवाय बदाम, अक्रोड, सुके अंजीर, मनुकाही खा म्हणजे प्रतिकारशक्ती वाढेल. मेंदूवरचा ताण हलका होईल. तुळशीची पानं नुसती न खाता ती ताकात किंवा दह्यात २-३ तास भिजत टाकून खा. आपल्या शरीराचं संतुलन बिघडलं असेल तर तुळशीमुळे ते पूर्ववत होतं!

बर्गर, पास्ता, मॅगी, वेफर्स, वडापाव आणि इतर *'जंकफूड'* खाण्याचे टाळा. त्यात *प्रोटीन्स, व्हिटॅमिन्स, फायबर, मिनरल्स* यांचं प्रमाण अगदी नगण्य असतं. काही प्रमाणात ते खारटही असतात, त्यात शरीरात ऊर्जा वाढवणारे, प्रतिकारशक्ती वाढवणारे आणि पौष्टिक घटक नसतात. त्यामुळे त्या पदार्थांमुळे तुमचं पोट भरलं, तरी अभ्यासासाठी लागणारी ऊर्जा तुम्हाला मिळणार नाही.

अरे हो! नुसता आहार योग्य घेऊन नाही चालणार! त्यासाठी एक-एक तासानं घरातच थोडं चाला किंवा हातापायाचे व्यायाम करा.

गोष्टीच्या पुस्तकातलं एखादं पान वाचा. व्यायाम आणि आहार यांची योग्य सांगड घातलीत आणि मन लावून अभ्यास केलात तर वर्षभर ऑनलाइन अभ्यास पद्धतीनेसुद्धा परीक्षेत घवघवीत यश मिळवू शकाल! परीक्षेतील सुयशासाठी तुम्हाला खूप खूप शुभेच्छा!!

– ऋतिका भावसार (आहार तज्ज्ञ)
४१/६६७, लोकमान्य नगर, पुणे 411030

विशेष उपक्रमाला प्रारंभ!

५ मार्च २०२१ रोजी महाराष्ट्रातील 'बालकुमार मासिका'च्या संपादकांचे ऑनलाइन चर्चासत्र छात्र प्रबोधनतर्फे झूमद्वारे आयोजित केले होते. त्यात सहभागी झालेल्या ७ मासिकाच्या संपादकांनी 'कोरोना' काळात केलेले वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम व अडचणींवर केलेली मात याबद्दल माहिती दिली. पुढील काळात बालकुमार वाचकांच्या घडणीमध्ये भरीव योगदान करण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करण्याबाबतही चांगली चर्चा झाली.

त्यादृष्टीने एक उपक्रम म्हणून यापुढे दर महिन्याला विविध मासिकांच्या आधीच्या महिन्याच्या मासिकातील प्रत्येकी एक लेख यांचं संकलन करून त्याची पीडीएफ, क्यू-आर कोडद्वारा सर्वांना वाचता येणार आहे व ही चौकट सर्व मासिकांमध्ये छापण्याचे सर्वांनी मान्य केले. त्यातून इतरही मासिकांचा परिचय सर्व मासिकांच्या वाचकांना होईल व त्यांच्या आवडीनुसार ते इतरही मासिकाचे सभासद होऊ शकतील, अशी अपेक्षा आहे.

छात्र प्रबोधन मासिकाला या उपक्रमात पुढाकार घेण्यामध्ये व समन्वय करण्यामध्ये नक्कीच आनंद होतोय!

बालकुमार मासिकांमधील साहित्याची झलक

सौर चैत्र महिन्यापासून बालकुमार वयोगटासाठी प्रकाशित होणाऱ्या अधिकाधिक नियतकालिकांचे मागील महिन्यातील मुखपृष्ठ, अंतरंग व त्याचबरोबर एक लेख सोबतच्या QR कोडद्वारे वाचता येईल. त्याची सूची खालीलप्रमाणे –

मार्च २०२१ च्या मासिकांमधील लेख

१. छात्र प्रबोधन : सृष्टीतून झिरपणारी स्वीकारशीलता – गिरीश कुलकर्णी
२. वयम : ॲनिमेशनच्या पूर्वज – मेधा आलकरी
३. निर्मळ रानवारा : मुक्तिवेग – ललितगौरी डांगे
४. मुलांचे मासिक : अपशकून? – सुरेश वांदिले
५. किशोर : उंटावरून शेळ्या हाकणे – संजय गोराडे
६. सृष्टिज्ञान : न्यूट्रिनो ऊर्जा : नवे वरदान – डॉ. मंदार खुर्जेकर
७. ऋग्वेद : कवितेची जन्मकथा – किरण डोंगरदिवे

माहिती मिळवा : भौगोलिक वैशिष्ट्ये – तैलबैल कातळकडा (लोणावळा, जि. पुणे, महाराष्ट्र) 'V' आकाराची भिंत.

वार्षिक देणगीदार – • श्री. मयुरेश सोहोनी, पुणे • एक हितचिंतक, दिल्ली • श्री. चिंतामणी बने, डोंबिवली

गोलिय गती आणि बल

साहित्य : १ मीटर दोरा, चेंडू (किंवा दगड) इ.

कृती : दोऱ्याच्या एका टोकाला चेंडू (किंवा दगड) बांधून घ्या.

चेंडूपासून १५ ते २० सेंमी.वर दोरा उजव्या हातात धरा, उरलेला दोरा उजव्या हाताच्या मागे काही अंतरावर डाव्या हातात धरा. उजव्या हातातील दोऱ्याकडे समोरून पाहिल्यास एखाद्या दोलकाप्रमाणे (Pendulum) दिसेल.

मोकळ्या जागी जाऊन उभे राहा. उजव्या हाताला गती देऊन दोरा गोल फिरवत राहा. उजव्या हाताभोवती आभासी वर्तुळ तयार (Virtual Circle) झालेले भासेल. गोल फिरणाऱ्या चेंडूचे आणि चेंडूमुळे तयार झालेल्या आभासी वर्तुळाचे निरीक्षण करा.

उजव्या हातातील दोरा गोल फिरत असताना डाव्या हातातील दोरा अशा तऱ्हेने मोकळा सोडा की, दोरा उजव्या हातातून थोडा (अंदाजे ६० सेंमी.पर्यंत) पुढे सरकेल.

दोरा गोल फिरत असताना थोडा मोकळा सोडल्यामुळे उजव्या हातापासून दोऱ्याच्या पुढच्या टोकाला बांधलेल्या चेंडूचे अंतर वाढेल. आता पुन्हा गोल फिरणाऱ्या चेंडूचे आणि चेंडूमुळे तयार झालेल्या आभासी वर्तुळाचे निरीक्षण करा.

उजव्या हातातील दोरा गोल फिरत असताना डाव्या हातातील दोरा हळूहळू खेचा ज्यामुळे उजव्या हातापासून दोऱ्याच्या पुढच्या टोकाला बांधलेल्या



चेंडूचे अंतर कमी होईल. हे अंतर कमी होत असताना गोल फिरणाऱ्या चेंडूचे आणि चेंडूमुळे तयार झालेल्या आभासी वर्तुळाचे निरीक्षण करा.

वरील क्रिया काही वेळ पुन्हापुन्हा करत राहा आणि चेंडूचे आणि आभासी वर्तुळाचे निरीक्षण करा.

निरीक्षण :

१. गोल फिरताना चेंडूचे उजव्या हातापासूनचे अंतर कमी असताना एक लहान आभासी वर्तुळ तयार करण्यासाठी लागणारा कालावधी, हा चेंडूचे हातापासूनचे अंतर वाढल्यामुळे तयार होणाऱ्या एका मोठ्या आभासी वर्तुळासाठी लागणाऱ्या कालावधीपेक्षा कमी असतो.

२. उजव्या हातापासून चेंडूचे अंतर म्हणजे आभासी वर्तुळाची त्रिज्या (Radius). चेंडूचे हातापासूनचे अंतर कमी-जास्त होते म्हणजे आभासी वर्तुळाची त्रिज्या कमी-जास्त होते.

विश्लेषण :

ज्याप्रमाणात वर्तुळाच्या त्रिज्येची लांबी कमी जास्त होते, त्याप्रमाणात वर्तुळाच्या परीघाची (Circumference) लांबी कमी जास्त होते.

एका बिंदूशी स्थिर अंतरावर राहून हवेमध्ये गोल फिरणाऱ्या पदार्थावर, फिरणाऱ्या दोऱ्याचा ताण जो असतो, या ताणासारखी अभिसारी बले म्हणूनही (केंद्राजवळ खेचणारी बलं - centripetal force) गणली जातात.

याउलट चेंडला स्वत:च्या जडत्वामुळे सतत दिशा बदलायचा जणू कंटाळा असतो. यामुळे दोऱ्याचा ताण व चेंडूचे जडत्व अशी ओढाताण चालू असते. या दोऱ्याच्या ताणाविरुद्ध काम करते आहे असे जे वाटते त्याला अपकेंद्री बल (केंद्रापासून लांब ढकलणारे) - (Centrifugal force) म्हटले जाते.

आणखी काय करू शकता :

- अपकेंद्री बल आणखी कोठे कोठे काम करते याची यादी करा. अपकेंद्री बल आणि पदार्थाचे वस्तुमान यांचा काही संबंध आहे का ते शोध.
- पदार्थ गोल फिरण्याची दिशा (घड्याळ्याच्या काट्याप्रमाणे आणि उलट दिशेने) आणि अपकेंद्री बल यांचा काही संबंध आहे का?

– प्रितेश लोले
pritesh.lole09@gmail.com

पाहा
घरी करता येण्यासारखे काही
विज्ञान प्रयोग.

कविता

वसंत कर्तृत्व...

तेज माखूनिया रंग उसळले पानोपानी।
मोहोरांच्या ओठी आली सुगंधाची गाणी।।

झुळकींचे हितगुज नवांकुरांशी रंगले।
नृत्य फुलपाखरांचे नक्षी रेखीत चालले।
दिला चैतन्य - सांगावा दाही दिशांना पक्ष्यांनी।
तेज माखूनिया रंग उसळले पानोपानी।।

कोकिळांच्या गायनाने आसमंत भारावला।
नादभारला आनंद कणोकणी मंतरला।
पुत्र ऋतू वसंताचे पाहे कर्तृत्व धरणी।
तेज माखूनिया रंग उसळले पानोपानी।।

– राजेंद्र अत्रे
पिंगलाक्ष, सूर्यनगरी, सांजा रोड,
हॉटेल सिटिपॉईंटच्या समोर, उस्मानाबाद (धाराशिव) 413501

माहिती मिळवा : भौगोलिक वैशिष्ट्ये - खाऱ्या पाण्याचे सरोवर (महाराष्ट्र - बुलढाणा) बेसॉल्ट खडकातील सरोवर.

वार्षिक देणगीदार - • श्री. शरद पालकर, पुणे • श्री. अजय घाणेकर, पुणे • श्री. रवींद्र गजेंद्रगडकर, पुणे

वसंतातले सौंदर्य पाहावे ते निष्पर्ण वृक्षांवर विविधरंगी फुलांचा बहर येतो तेव्हा! पण जेव्हा त्या फुलांचा सडा जमिनीवर पडतो तेव्हाचं त्या फुलांचं सौंदर्य देखील अतिशय पाहाण्यासारखं असतं. वृक्षाशी त्या फुलांचं नातं तुटतं; पण त्यांनी वृक्षाला 'नवीन नातं' जोडून दिलेलं असतं. जणू नवनिर्माणाच्या कार्याला त्यांनी अगदी मूकपणे साहाय्य केलेलं असतं!

ललित

वसंत सौंदर्यसडा!!

– डॉ. कांचनगंगा गंधे

निसर्गातल्या सर्व ऋतूंचा राजा, अगणित फुलांनी लगडलेला, रंग छटांनी नटलेला, लावण्याचा, उत्साही गंधाचा, सळसळत्या चैतन्याचा, सूर्याच्या दाहकतेतही विजयी पताका मिरवणारा ऋतू म्हणजे 'ऋतुराज वसंत!'

सचेतन सृष्टीचं द्योतक असलेला वसंत! निसर्ग सौंदर्याचा अनुपम आविष्कार म्हणजे वसंत!

खरंतर, प्रत्येक ऋतूचं आकाशापासून धरतीपर्यंतचं नातं जोडलेलं आणि जडलेलं देखील असतं! प्रत्येक ऋतूच्या नात्याची वीण वेगवेगळी. साहजिकच लागणारे धागे, त्यांच्या तयार केलेल्या लडी, त्यांचा आविष्कार, त्यांचं एकत्र येणं आणि उलगडणं वेगवेगळं! त्या-त्या ऋतूत त्या-त्या पद्धतीची वीण आवडणारी आणि हवीहवीशी देखील वाटणारी! साऱ्यांचा उद्देश एकच- सृष्टीचा ताल सांभाळायचा, तिला सचेतन ठेवायचं, चक्रासारखं फिरत ठेवायचं!

शिशिर संपला. वृक्षयष्ट्या निष्पर्ण झाल्या, उघड्या-बोडक्या झाल्या; पण त्यांनी आधीच झाडाच्या आतमध्ये धाग्यांच्या लडीच्या लडी तयार ठेवल्या होत्या. वसंतऋतूचं आगमन व्हायला लागलं, तोच वृक्षयष्ट्यांमधून विविधरंगी धागे, लडीच्या लडी बाहेर पडायला लागल्या.

वसंताची नांदी सुरू झाली. फिकट पिवळट, हिरव्या रंगांच्या फुलांचा 'वावळा' फुलला. वृक्षावर अलगद सडा शिंपावा तशी त्याची फुलं वृक्ष दांड्यांवर फुलली होती; पण फारशी डोळ्यात भरत नव्हती. वसंतऋतू सुरू झाल्याची ललकारी दिली ती भगव्या रंगाच्या मऊ, लुसलुशीत मखमली 'पळस' फुलांनी! झाड फुलांनी पूर्ण भरून ओसंडून वाहात होतं! आकर्षक रंग आणि 'मधुर' रस त्यात भरलेला! साहजिकच लहान-मोठे सारे

वार्षिक देणगीदार – • श्री. तन्मय बुडुख, सिॲटल, अमेरिका • श्री. किशोर पंडित, चेंबूर, मुंबई
• असेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि., पुणे

पक्षीगण फुलांवर तुटून पडले होते. वसंत किती सचेतन आहे याची जाणीव होत होती. फुलातला मध चाखताना वृक्षाच्या नवनिर्माणाच्या क्रियेला आपण मदत करतोय, हे पक्ष्यांच्या गावीही नव्हतं! परस्परांच्या सहकारातून, नकळत एक नवीन 'बीज' तयार होत होत! परस्पर सहकार संपला की, फुलं टपटप खाली पडत होती! केशरी रंगाचा, पोपटांच्या चोचीसारख्या असंख्य फुलांचा भरगच्च सडा जमिनीवर, वृक्षाच्या सभोवताली घातला गेला होता.

वसंतामध्ये कुणीतरी, कुणास्तव सतत काहीतरी करण्याच्या धडपडीत असतं! कडेकपारीतून पानांच्या बेचक्यातून लाल रंगाची, केशरी पुंकेसराची 'धायटी' फुलत होती. भुंगे, किडेमकोडे तिच्यातला मध खायला आसुसले होते. मध संपला की, फुलं गळत होती; पण त्यांचा सडा दाट नव्हता. जमिनीवर अधूनमधून लाल पाणी शिंपडावं तसं दिसत होतं.

'गणेरी'नं तिचा पिवळा जर्द दागिना निष्पर्ण वृक्षभर घातला होता. नवनिर्माणाचं कार्य करणारा फुलातला आतल्या केशरी सोनेरी भागावर किडे, पक्षी ताव मारत होते. कार्यभाग संपला की, पाकळ्या, फुलं जमिनीवर पडत होती. मोठा; पण तलम गालिचा झाडाभोवती, धरतीवर विसावत होता. फुलातला गाभा मात्र झाडावरच थांबला होता; नवनिर्माणाचं कार्य शेवटापर्यंत नेण्यासाठी! अर्थात सगळ्या वसंतातल्या फुलांची हीच रीत होती.

'शाल्मली'चा तर ठसठशीत, हाताएवढ्या लालभडक फुलांचा सडा धरतीवर पडला होता; पण त्या 'फुल दागिन्या'चं वृक्षाशी असलेलं नातं संपलं होतं. फुलाच्या तळाशी ती 'खूण' दिसत होती, पण नव्या 'जीवाला' जन्म देण्यासाठी फुलांनी स्वत:चं जीवन सार्थकी लावलं होतं!

'गुलाबी सेरिसिडीया' चा सडा म्हणजे असंख्य फुलपाखरं जमिनीवर उतरल्यासारखी भासत होती.

पिवळ्या 'टबुबिया'च्या वृक्षतळी कुबेरानी सोन्याच्या राशींचा सडा घातल्याचा भास होत होता. गुलाबी 'टबुबिया' भोवती गुलबट नाजूक सडा घातला गेला होता. 'रानपांगारा' मात्र छोट्या, शिस्तीत वाढलेल्या फुलांचा छोट्या पंखांसकट जमिनीवर सडा घालत होता.

सात्विकतेचं तेज जराही कमी होऊ न देता देवापुढे सडा घातला होता; तो पांढऱ्या, गुलाबी

माहिती मिळवा : भौगोलिक वैशिष्ट्ये - रांजणखळगे (महाराष्ट्र -अहमदनगर) आशिया खंडातील सर्वात मोठे कुंड.

वार्षिक देणगीदार – • डॉ. अभय व डॉ. वीणा लिमये, पुणे • श्री. अजय फाटक, पुणे
• कु. राधा श्रावण हर्डीकर, पुणे

आणि तांबड्या 'देवचाफ्यानं!' 'जांभूळ', शिरीष, 'कर्पेरिस' यांनी तर 'भुरभुरता' सडा जमिनीवर पसरवला होता. इतरांपेक्षा वेगळा दिसणारा; पण धरती भरून जाईल असा!

आंब्याच्या मोहोराची तीच रीत! बाळकैऱ्या यायला लागल्यावर बाकीची फुलं मोहोर सोडून जमिनीवर विसावत होती. 'सीतेचा अशोक'चे लाल, नारिंगी घोसच्या घोस फुलले होते. एकेका घोसात असंख्य छोटी फुलं! नववधूची लाल कुंकवाची पावलं जमिनीवर अलगद उतरावी, असा भास होत होता. गुलाबी, तांबडा 'कशिया' म्हणजे गुलाबदाणीतून पाणी शिंपावं आणि ते थोडं थोडं अंगावर उडावं तसा फुलांचा सडा जमिनीवर पडत होता, एकदम नाजूक!

रानावनातला वसंत सोहळा तर रंगांची परमावधी! गडद-निळी, जांभळी पैंजणं बांधावीत तशी फुललेली 'अंजनी', मातकट रंगांची, सुगंधित 'बकुळ', 'मोह', मधुमालती वेल, सुगंधी पांढरी 'बारतोंडी', 'निर्मळीचे' तुरे.

सुवासिक अत्तराच्या कुप्या स्वत:जवळ बाळगणारा पिवळ्या मंजिऱ्यांचा 'काकडा', पांढरा शुभ्र चांदण्यांसारखा भासणारा सुवासिक 'कुडा', पांढरी सुरंगी, 'पिवळा दवणा', पानाचा अशोक, वायवर्णा, तेंदू, मेढसिंग, डिकेमाली यांची सुवासिक पांढरी फुलं, पिवळसर आणि इतरांपेक्षा वेगळ्या धाटणीचा दागिना असलेली 'शिवण'ची फुलं, 'हिंगण बेट', उक्षी, मोगरा, पिवळा धमक 'पुष्कराज बहावा', लाल माणकं असलेला ठसठशीत 'गुलमोहोर' असे सारेच वृक्षावरचे आणि धरतीवरचे वसंतसौंदर्य वाढवत होते; पण वसंत मात्र तृप्त झाला होता, तो कडुलिंबाच्या कडवट, नाजूक फुलांच्या सड्यामुळे!

नवनिर्माणाचं कार्य सुरू झालं की, फुलाचं जीवन सार्थकी लागतं. 'मरणी अमरता' कशी असते, याचं भान या गळलेल्या फुलांमुळे येतं! याच वसंतात फळांची निशाणी झाडावर दिसायला लागते म्हणून ज्ञानेश्वर म्हणतात -

जैसे ऋतुपतींचे द्वार । वनश्री निरंतर।
वोळगे फळभार । लावण्येंसी ।।

⁂

– डॉ. कांचनगंगा गंधे
४१/६६७, लोकमान्य नगर, पुणे 411030

पाहा
वसंत वैभव वाढवणाऱ्या
फुलांची प्रकाशचित्रे

बुद्धीला खुराक

शब्दांची अदलाबदल

पुढे दिलेले शब्द योग्य क्रमाने लावून अर्थपूर्ण चार-चार म्हणी तयार करा.

१) मीठ, तसे, नसतात, फार, करावे, कावळ्याच्या, अळणी, गाई, उथळ, मरत, नावडतीचे, पाण्याला, भरावे, शापाने, खळखळाट

२) माती, काळाच, कोल्हा, तशी, त्याला, कोळसा, राजी, खाण, खवखवे, उगाळावा, काकडीला, तितका, खाई

अशाच प्रकारे तुमच्या भागात म्हटल्या जाणाऱ्या म्हणी लिहून काढा. त्यात असणारे शब्द उलट-सुलट क्रमाने लावा. आता तुमच्या मित्र-मैत्रिणींना शब्दांची अदलाबदल केलेले हे कोडे वेळ लावून सोडवायला सांगा.

हळदीने माखलेला, पीत बहावा सजला। श्वेत चाफ्याच्या गालाला, रंग त्याचा उमटला।।

वार्षिक देणगीदार - • डॉ. जयेश राहाळकर, पुणे • श्री. सुभाष माळी, पुणे
• 'संतुल' उद्योजक, श्री. मिलिंद संत, पुणे

कलाकृती

रद्दी कागदापासून कलाकृती

साहित्य : मैदा, पाणी, कागद/वर्तमानपत्र, वाटी किंवा छोटी ताटली, खोबरेल तेल, कात्री, *फेव्हिकॉल, व्हाइटनिंग पावडर (कॅल्शियम कार्बोनेट)*, रंग, *वॉर्निश, ब्रश.*

कृती :

१) सहा वाट्या पाण्यात अर्धी वाटी मैदा कालवून त्याची पातळ खळ शिजवा. गार करण्यास ठेवा.

२) जास्त पाणी शोषून घेण्याची क्षमता असलेले कागद किंवा जुन्या वर्तमानपत्राचे कागद घ्या. त्याचे छोटेछोटे, हाताने फाडून असे तुकडे करा की, पटकन उचलून ते चिकटवता येतील.

३) ज्या वस्तूचा साचा करायचा असेल, त्या वस्तूस बाहेरून खोबरेल तेल लावा.

४) आता त्या वस्तूवर कागदाचा एकेक तुकडा खळीत बुडवून त्या वस्तूवर चिकटवत जा. एका कागदाच्या तुकड्यावरच थोडा दुसरा तुकडा बसेल असे चिकटवत जा. असे साधारण कागदाचे ९-१० थर करा.

५) उन्हात ही वस्तू खडखडीत वाळल्यावर हा साचा म्हणजे आपण तयार केलेली कलावस्तू ही मूळ वस्तूपासून अलगद वेगळी करा. ओबडधोबड कडा कात्रीने व्यवस्थित कापा.

६) फेव्हिकॉलमध्ये थोडी *व्हाइटनिंग पावडर* मिसळून, या मिश्रणाचा पातळ थर आपण तयार केलेल्या वस्तूस आतून व बाहेरून लावा. यामुळे वस्तू खडबडीत न दिसता गुळगुळीत प्लेन दिसते.

७) आता ही तयार झालेली वस्तू ऑईलपेंट किंवा फॅब्रिक कलर्सने रंगवा. वाळल्यावर वॉर्निशचा हात दिल्यास वस्तू चमकदार व आकर्षक दिसते.





पाहा
कागदी लगद्यापासून
तयार होणारी फुले आणि फुलदाणी.

– हेमा धोत्रे
१९, दीपाली अपार्टमेंट, विठ्ठलनगर कॉलनी,
आनंदनगर, सिंहगड रस्ता, पुणे 411051

(पूर्वप्रसिद्धी – सुबोध द्वैमासिक चैत्र, शके १९३९/मार्च २०१७)

माहिती मिळवा : भौगोलिक आविष्कार – गरम पाण्याचे झरे – (मणिकरण-हिमाचल प्रदेश) खडकांमधून गरम पाणी दाबाने वर येते.

वार्षिक देणगीदार – • डॉ. विनायक देसूरकर, पुणे • कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे • श्री. अनंत बेडेकर, वाई, जि. सातारा

‘एप्रिल’ ची जन्मकथा

ग्रेगोरियन दिनदर्शिकेमध्ये ‘एप्रिल’ हा तीस दिवसांचा वर्षातील चौथा महिना! रोमन दिनदर्शिकेमध्ये पूर्वी तो २९ दिवसांचा आणि दुसरा महिना होता. पोप ग्रिगोरे - तेरावे यांनी १५८२ मध्ये ‘एप्रिल’ महिन्यात एक दिवस वाढवून तो तीस दिवसांचा महिना केला.

‘एप्रिल’ हे नाव कसं दिलं गेलं याविषयी वेगवेगळे प्रवाद आहेत. ‘एप्रिल’ हे नाव ‘एप्रिलिस’ या लॅटिन शब्दावरून दिलं गेलं! हा शब्द ‘ओपेरिरे’ या लॅटिन शब्दावरूनच तयार झालाय! ‘ओपेरिरे’ म्हणजे ‘उघडणं’/‘उमलणं’! याच काळात/महिन्यात निष्पर्ण झाडांवर/वृक्षांवर फुलं उमलतात, त्यांना बहर येतो, म्हणूनच ‘ओपेरिरे’ म्हणजे ‘एप्रिल’ हे नाव दिलं गेलं असावं!

पूर्वी महिन्यांची नावं देव-देवतांच्या आदरार्थ दिली जायची. रोमन लोकांची ‘व्हिनस’ (प्रेम/सौंदर्य देवता) या पूजनीय देवतेवरून ‘एप्रिल’ हे नाव दिलं गेलं. ‘एप्रिलिस’ हा ‘व्हिनस’ देवतेचा पूजा करण्याचा पहिला दिवस! ग्रीक देवता ‘अ‍ॅफ्रोडाईट (अ‍ॅफ्रॉस - प्रेम/सौंदर्य देवता) हिच्याही आदराप्रित्यर्थ ‘एप्रिल’ हे नाव दिलं गेलं!

इसवी सनाच्या पाचव्या शतकाच्या आसपास ‘अँग्लो-सॅक्सॉन’ हा जर्मन लोकांचा एक ‘सांस्कृतिक गट’ इंग्लंडमध्ये स्थायिक झाला होता. त्यांची देवता ‘इओस्त्रे’ (Eostre) हिच्या आदरार्थ ‘इओस्त्रे’ मंथ’ किंवा ‘ओस्टर-मंथ’ (Eostre-monath/Oster monath) म्हणजेच आत्ताचा ‘एप्रिल’ हे नाव दिलं गेलं!

‘एप्रिल’चा अध्यात्मिक अर्थ ‘स्थिर संतुलन समतोल’! हा महिना म्हणजे वाढीचा महिना, नवनिर्मितीचा, सकारात्मक महिना! याच महिन्यात वृक्षांवर फुलं आणि फळं येतात म्हणजेच नवनिर्मितीचा हा काळ आहे. वृक्षांवरची पानगळ संपून निसर्गात सकारात्मक बदल घडतात म्हणूनच ‘एप्रिल’ महिना ‘उन्हाळा’ ऋतुतला महिना असला तरी तो निसर्गातला ‘फुलणारा’ महिना आहे.

या निमित्ताने ‘एप्रिल फूल’ची जन्मकथा शोधा बरं!

डॉ. कांचनगंगा गंधे, ४१/६६७, लोकमान्य नगर, पुणे 411030

वसंतऋतूची नांदी फाल्गुनात (मार्च) पाहावी, तर चैत्रात (एप्रिल) वसंतऋतूची, निसर्गातील परमावधी अनुभवावी. चैत्र शुद्ध प्रतिपदेला म्हणजेच गुढीपाडव्यापासून उन्हं तापायला लागतात. चैत्रात गुंफलेला वैशाख सृष्टीला भाजून काढतो. (दिवसा सूर्याचं तेज अन् रात्री चंद्राचा प्रकाश वाढायला लागतो.) वैशाख शुद्ध तृतीयेला सूर्य, चंद्र आणि पृथ्वी यांची एकामेकांमधली स्थिती अशी असते की सूर्य-चंद्राचे तेज जास्तीत जास्त प्रमाणात पृथ्वीवर पोहोचते. तो दिवस म्हणजे ‘अक्षय्य तृतीया’ साडेतीन शुभमुहूर्तांपैकी एक शुभ मुहूर्त. अक्षय कधीही नाश न पावणारे, लयाला न जाणारे, कधीही कमी न होणारे! म्हणून आपल्या संस्कृतीत गुढीपाडवा आणि अक्षय तृतीयेला महत्त्व आहे!

तिन्हीसांजा टाकी, मोहून मोगरा शुभ्र कळ्यांचा। कृष्णवस्त्री शोभे कशिदा, गंधितसा काय हिऱ्यांचा।।

वार्षिक देणगीदार - • सौ. उषा पुरंदरे, पुणे • एक हितचिंतक, पुणे
• श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे

स्वयं शोध चाचणी ११ – लेखन कौशल्य – २

या चाचणीतील प्रश्नांचे उत्तर देताना, नेहमीच/कधीतरी/क्वचित/कधीच नाही यांपैकी कोणतातरी एक पर्याय निवडा आणि त्यासाठी खालील गुण देण्याच्या पद्धतीनुसार त्या प्रश्नांपुढे गुण द्या. हे काम प्रामाणिकपणे करा.

प्रश्न	गुण देण्याची पद्धत – नेहमीच – ४ , कधीतरी – ३, क्वचित – २ , कधीच नाही – १	गुण
१. त्या-त्या भाषेचे व्याकरण समजून घेऊन मी लेखन करायचा प्रयत्न करते/करतो का?		
२. लिहिताना शब्दांचा चपखल वापर करणे मला जमते का?		
३. प्रश्नांचे अपेक्षित उत्तर मी नेमक्या शब्दांमध्ये लिहू शकते/शकतो का?		
४. दीर्घोत्तरी प्रश्नांसाठी उत्तराचे मुद्दे दिले तर त्याचे पूर्ण उत्तर मला माझ्या शब्दांत लिहिता येते का?		
५. लिहिताना 'एक मुद्दा एक परिच्छेद' असे मी लिहिते/लिहितो का?		
६. स्वतःचे विचार मला नेमक्या शब्दांमध्ये लिहिता येतात का?		
७. दिलेल्या विषयावर मुद्द्यांची सुसंगत मांडणी करून मला लिहिता येते का?		
८. प्रतिभाशाली लेखन (कथा, कविता, ललित लेख, नाटक, एकांकिका, व्यक्तिचित्रण इत्यादी) करणे मला जमते का?		
९. प्रश्नाचा रोख/स्वरूप (उदा. तुलना करा/फरक लिहा इत्यादी) लक्षात घेऊन त्यानुसार लिहिणे मला जमते का?		

एकूण

वरील चाचणी सोडवून गुणांची बेरीज करा. तुमचे संभाषण कौशल्य वाढवण्यासाठी तुम्हाला मिळालेल्या गुणांनुसार पुढे काही कृती करायला सुचवल्या आहेत, त्या अवश्य करा.

१८ पेक्षा कमी गुण – तुमच्या लेखनात नेहमी होणाऱ्या व्याकरणातल्या चुका शोधा व त्या सुधारण्यासाठी लेखन सराव करा. व्याकरणाचे पुस्तक सतत वाचनात असू द्या.

१८ ते २७ मधील गुण – विविध प्रकारचे अवांतर वाचन करून अनेकांची लेखन शैली समजून घ्या. शब्दसंपत्ती वाढवा. नेहमी वापरायला लागणाऱ्या शब्दांच्या समानार्थी शब्दांचा संग्रह करा आणि लेखन करताना शब्दाची योग्य छटा वापरण्यावर भर द्या.

२७ पेक्षा जास्त गुण – निबंधलेखन, पत्रलेखन करताना मुद्दे काढून, त्याचा योग्य क्रम मांडून, त्यात कोणती उदाहरणे, काव्यपंक्ती, वचने यांचा वापर करायचा, सुरुवात-शेवट काय करायचा इत्यादीबाबत कच्चे टिपण करण्याचा सराव करा. आणि मग प्रत्यक्ष लेखन करा.

प्रतिसादी वाचकवीर व्हा... (वर्ष २१/७)

हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. १५ मे २०२१ पर्यंत 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी! या निमित्ताने तुम्ही अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.

प्रश्नांची उत्तरे लिहा –

१) 'मित्रा अभिमान वाटतो तुझा...!' या कथेत मित्र म्हणून सोहमचा माधवला अभिमान का वाटतो?

२) 'हर्षोल्हाची गुढी' या कवितेत वसंतऋतूत दिसणाऱ्या निसर्गाचं कवीनं केलेलं वर्णन लिहा.

३) महात्मा फुले यांना द्रष्टे समाजसुधारक का म्हणतात?

४) शरीराचं बिघडलेलं संतुलन पूर्ववत करण्यासाठी कोणत्या वनस्पतीचं सेवन करावं?

५) 'वसंत सौंदर्यसडा'मध्ये उल्लेख केलेल्या किमान ५ फुलांची प्रकाशचित्रे काढा व फुलांची शास्त्रीय माहिती मिळवा.

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ चैत्र, शके १९४३, १ एप्रिल २०२१ या दिवशी प्रकाश ऑफसेट, ८२, पर्वती टॉवर्स, पुणे – ९ येथे छापून,ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.

यह मासिक पत्रिका ज्ञान प्रबोधिनी संस्था के स्वामित्व में है। मासिक के मुद्रक, प्रकाशक और संपादक श्री. महेन्द्र सेठिया इन्होंने यह मासिक राष्ट्रीय सौर ११ चैत्र, शके १९४३ तथा १ अप्रैल २०२१ इस दिनांक पर प्रकाश ऑफसेट, ८२, पर्वती टॉवर्स, पुणे – ९ यहाँ मुद्रण कर के ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० से प्रकाशित की है।

सळसळणारे धवल तेज हे

सळसळणारे धवल तेज हे छाती काढून खडे
गरुडालाही झेप लाजवी गगन तोकडे पडे ।। ध्रु. ।।

सुपुत्र बनलो आज आईचे तोडुन फसवी नाती
स्वर्गसुखाची हसतच देऊ तिजसाठी आहुती
या मातीचे सुवर्ण करण्या श्वसना धार चढे ।। १ ।।

पाजळलेली मशाल हाती उज्ज्वल परंपरेची
चक्र नियतिचे उलटे फिरवू आण तिच्या दीप्तिची
तिच्या प्रकाशी सुगम भासती भेडसावते कडे ।। २ ।।

विश्वाचे हे विशाल अंगण नभ वरती खालती
चंद्रसूर्य तर सखे सोबती तारा बोलावती
तेज तयांचे प्राशुन धावू कल्पान्तापलिकडे ।। ३ ।।

मोहक सुंदर गोड मार्ग हे भुरळ मना घालती
व्यवहाराची सूत्रे पोकळ तोऱ्याने मिरविती
दिमाख त्यांचे दिपवू फेकुनि स्फूर्तिप्रभा चहुकडे ।। ४ ।।

ऊर्मि उमलत्या उरात अमुच्या भरारिची जरि असे
झिजल्यावाचुन सुवास दुर्लभ हेहि मना कळतसे
काट्यांवरूनी आज चालणे, गुलाब येतिल पुढे ।। ५ ।।

भास सर्वही विरुनी गेले ध्येयरूप उजळले
दुभंगलेले राष्ट्र उभविण्या अता विडे उचलले
नव्या प्रभूला पहा पूजिण्या पाउल पुढती पडे ।। ६ ।।

– विनय हर्डीकर

या पद्याची चाल ऐका आणि पद्य म्हणा!

पद्याचा भावार्थ : आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य असलेल्या, चैतन्याने सळसळणाऱ्या, देशप्रेमाने भारलेल्या तरुणांचे मनोगत प्रस्तुत पद्यात व्यक्त झाले आहे. मायेचे पाश तोडून, भौतिक सुखांचा त्याग करून आम्ही ही आपली भूमी सुजलाम्-सुफलाम् करण्यासाठी सज्ज झालो आहोत. आमच्या देशाची उज्ज्वल परंपरा आम्हाला सन्मार्ग दाखवते आहे. तिच्या प्रकाशात, इतिहासातून प्रेरणा घेऊन, उत्तुंग अशा संकटांवर मात करत आम्ही अशक्य गोष्टी शक्य करून दाखवू. आमच्या कर्तृत्वाला सगळं विश्व खुलं आहे. मनाला भुलवणारी अनेक आकर्षणे भोवताली आहेत. सामान्य व्यावहारिक जगाचीही बंधने आहेत; पण त्यात गुंतून न पडता आम्ही आमच्या कर्तृत्वाचे तेज सर्वत्र पसरवू.

चंदनाचा सुगंध हा झिजल्यानंतरच (गंध उगाळल्यानंतरच) येतो; गुलाब हवा असेल तर काटा हा रूतणारच. तसेच आपापल्या कामात यश मिळवायचे, तर नुसती स्वप्नांची भरारी उपयोगाची नाही; कृती करायला हवी याची जाणीव आम्हाला आहे. सगळे भ्रम बाजूला सारून आपल्या राष्ट्राला जोमाने उभे करण्याचा निश्चय आम्ही करत आहोत.

'देश हाच देव' मानून आमची मार्गक्रमणा होत राहील. देशाच्या विकासाची स्वप्ने पाहाणाऱ्या, देशाला खंडित करणाऱ्या विध्वंसक शक्तींवर मात करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या, स्वप्नांना प्रत्यक्षात आणण्यासाठी कृतीची जोड देणाऱ्या तरुणांचे आश्वासक चित्र प्रस्तुत पद्यात उभे केले आहे.

सौर चैत्र, शके १९४३/ एप्रिल २०२१ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर ११ चैत्र, शके १९४३/१ एप्रिल २०२१
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR /2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (SDM/Pune/SR/139/2017)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2021-2023
Date of posting : On 1st day of every month, At the Post office S. P. college, Pune - 30. Date of publication : 1-4-2021

निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर वसंतवैभव वाढवणाऱ्या, निष्पर्ण अशा पांढऱ्या चाफ्याचं काढलेलं प्रकाशचित्र!
– महेन्द्र सेठिया, jpmahen@gmail.com

सौर दिनदर्शिका शके १९४३		
	एप्रिल २०२१	चैत्र वैशाख
गु.	1	चै.११
शु.	2	१२
श.	3	१३
र.	4	१४
सो.	5	१५
मं.	6	१६
बु.	7	१७
गु.	8	१८
शु.	9	१९
श.	10	२०
र.	11	२१
सो.	12	२२
मं.	13	२३
बु.	14	२४
गु.	15	२५
शु.	16	२६
श.	17	२७
र.	18	२८
सो.	19	२९
मं.	20	३०
बु.	21	वै.१
गु.	22	२
शु.	23	३
श.	24	४
र.	25	५
सो.	26	६
मं.	27	७
बु.	28	८
गु.	29	९
शु.	30	१०

सभासदांनी आपले व्हॉटस् ॲप संपर्क क्रमांक कळवले नसल्यास ९८५००३५३९८ या भ्रमणभाषवर लवकरात लवकर कळवावे. म्हणजे सभासदांशी संपर्क साधता येईल.	**सौर दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.**

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (020) 24207 174/175
www.chhatraprabodhan.org
इ–मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
या अंकाची किंमत : ₹ २०
वार्षिक वर्गणी : ₹ २००

प्रिय पोस्टमन,

कोरोनाच्या संकटकाळातही जोखीम पत्करून हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करत आहात. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे.

तुम्ही सुरक्षित राहावे ही प्रार्थना व सर्वतोपरी काळजी घ्यावी, ही आपुलकीच्या नात्याने विनंती!

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन